# उत्कर्ष

## (आत्मचरित्र)

सूर्यकांत ससाने



विनय प्रकाशन, तळभोग

**UTKARSH (Biogrophy)**

| | |
|---|---|
| Editor | : Suryakant Sambhaji Sasane<br>Mob. 9591636273 |
| All Writes | : Mahananda Suryakant Sasane |
| Publisher | : Vinay Prakashan, Talbhog<br>Tq. Basvakalyan Dist. Bidar (Karnataka State) |
| Typist | : Jay Malhar Offset, Aurad Sha.<br>Tq. Nilanga Dist.Latur (Maharashtra) |
| Printing | : Pavan Offset, Latur |
| Publish | : 15/10/2023 |
| Price | : Rs. 200/- |

| | |
|---|---|
| उत्कर्ष | : आत्मचरित्र |
| आत्मचरित्रकार | : सूर्यकांत संभाजी ससाने<br>मो. ९५९१६३६२७३ |
| © सर्व हक्क | : सौ. महानंदा सूर्यकांत ससाने |
| प्रकाशन | : विनय प्रकाशन, तळभोग<br>ता. बसवकल्याण जि. बिदर (कर्नाटक) |
| टायपिंग | : जय मल्हार ऑफसेट, औराद शहा.<br>ता. निलंगा जि. लातूर (महाराष्ट्र) |
| मुख्यपृष्ठ सजावट | : मुगळे प्रिंटर्स, उमरगा (महाराष्ट्र) |
| मुद्रण | : पवन ऑफसेट, लातूर |
| प्रकाशन दिनांक | : १५/१०/२०२३ |
| किंमत | : रु. २००/- |

## पाठीवरील थाप

सूर्यकांत ससाने यांच्या उत्कर्ष या पुस्तकाला आत्मचरित्र म्हणावे की,आत्मचिंतन म्हणावे असा प्रश्न काहींना पडला असला तरीही, खरे तर, आत्मचरित्र हे आत्मकथनच असते. त्यात आत्मचिंतनही असते. सूर्यकांत ससाने यांनी आपल्या कुटुंबाच्या संघर्षमय जगण्याचा नि जगल्याचा आज पर्यंतच्या समग्र जीवनाचा ताळेबंद रोजनिशीच्या अर्थात डेली-डायरीच्या स्वरूपात मांडलेला असला तरीही, त्यातील मानवी संवेदना खूप महत्त्वाच्या आहेत. खरे तर, आत्मकथन हे आपल्या जीवनात घडलेल्या विविध घटनांचा लेखाजोखा एकत्रित बांधणे म्हणजेच आत्मचरित्र, सूर्यकांत ससाणेंनी हा लेखाजोखा तारखेसहित एकत्रित करून रोजनिशेचे रूपांतर आत्मकथनात केलेला आहे. अनेक दुःखाच्या वाटेवरून हे आत्मचरित्र उत्कर्षा पर्यंत पोहचलेले आहे. यातील अनेक घटना हृदयाचा ठाव घेणाऱ्याही आहेत. हे आत्मचरित्र वाचल्यानंतर नक्कीच उमगल्याशिवाय राहणार नाही.

सूर्यकांत ससाने एक हाडाचे शिक्षक, शिक्षकाच्या शिक्षिकी जबाबदाऱ्या पेलण्याचे सामर्थ्य असणारा शिक्षक, असे म्हंटले तर वावगे ठरणार नाही. यांनी आत्तापर्यंतच्या आयुष्याचा ताळेबंद ज्यात रुपांतरीत केला ते उत्कर्ष या नावाचे आत्मचरित्र खरंतर, हे आत्मकथन विद्यार्थीदशे पासून  कष्टमय आणि दुःखमय जीवनाच्या ससेहोलपटीतच जगत राहिले. नोकरी मिळाल्याच्या आनंदात नातेगोते, घर-बाळ आनंदून गेल्यानंतरही तब्बल बारा वर्ष बिन-पगारी शिक्षक म्हणून सूर्यकांत ससाने यांनी कधी तळभोग इथून जाणं- येणं करून, कधी भाड्याच्या रूममध्ये राहून, कधी ट्युशन घेऊन, तर कधी इतराच्या मदतीवर, दारिद्र्यात बिनपगारी शिक्षक म्हणून जगले. दारिद्र्य आणि बेकारी प्रचंड वाईट असते, नीट जगूही देत नाही नि मरूही देत नाही. अशा जगण्या - मरण्यातल्या सहवासात सूर्यकांत ससाने यांनी तब्बल एकतप  काढले. पण शिक्षकाच्या जबाबदारीतून कधीच पळ काढला नाही.  ही निष्ठा जपणारे सूर्यकांत ससाने इतरांपेक्षा वेगळ्या वाटेने जगणारे शिक्षक आहेत. सामाजिक जाणीवांच्या विविध सामाजिक चळवळीत,

साहित्य चळवळीत ते अनेक पातळीवर कार्यरत आहेतच. सूर्यकांत ससाने हे कर्नाटक मधील मराठी साहित्य चळवळीचे सक्रिय आणि निष्ठावंत साहित्यिक कार्यकर्ते म्हणून त्यांनी आपला ठसा विविध साहित्य संमेलनात, कवी संमेलनात, विविध साहित्य जागरात ठळकपणे उमटविलेला आहे. ते अखिल भारतीय परिवर्तन मराठी साहित्य परिषदेचे कर्नाटक राज्याध्यक्ष म्हणून त्यांनी मराठी साहित्याची सेवा करत आहेत. त्याही शिवाय कुठल्याही समाजाच्या समाज प्रबोधनाच्या कार्यक्रमात कार्याशील कार्यकर्ते म्हणून तेथे स्वतः उपस्थित राहून, त्या कार्यक्रमाच्या आयोजन-नियोजनामध्ये सहभाग नोंदवणारे, गरज पडेल तेथे मार्गदर्शनही करणारे समाजशील शिक्षक म्हणून सूर्यकांत ससानेकडे पाहावे लागणार आहे. महात्मा बसवेश्वरांच्या जातीअंताच्या आणि समतेचा विचार-व्यवहार घेऊन आजही जगणारे बसवकल्याण येथील कल्याण क्रांतीतून निर्माण झालेल्या अनुभव मंटपाच्या विविध कार्यक्रमात ससाने हे सातत्याने अग्रेसर राहिलेले आहेत. माणसावर प्रेम करणारा, ज्यांनी-ज्यांनी आपल्या आयुष्यामध्ये मदत केलेली आहे, त्यांच्याशी कायमनिष्ठा ठेवून जगणारा त्याही पुढे जाता, माणसाची मनस्वीपणे नाते जोडणारा माणूस म्हणून सूर्यकांत ससानेची सर्व दूर ओळख आहे. सूर्यकांत ससाने यांनी अनेक कष्टाची कामे केली, दुःख दैन्याच्या अनेक वाटेवरून त्यांचं मार्गक्रमण सतत राहिलेले आहे. पुणे-मुंबई, गावात, शेतात आणि मिळेल तेथे आणि मिळेल ते कष्ट उपसत त्यांनी आपल्या संसाराचा गाडा पुढे ओढीत नेत आहेत. पुणे-मुंबईतील कंपनीतील कामगार, छोट्याशा रूम मधील पोटा-पाण्यासाठी मांडलेला कोपऱ्यातला संसार, मिळेल तिथे नात्यागोत्यांकडे आसरा घेऊन, आपल्या कुटुंबासाठी दिवस-रात्र मिळेल ते, मिळेल तेथे, कोणत्याही कष्टाच्या कामातून रक्त आठवण्याचे आणि घाम गाळण्याचे कष्ट केले आहे. त्यातूनच पोटाची आग भागवण्यासाठीच जीवनाची भटकंती हे सूर्यकांत ससानेच्या वाटणीला आलेली आहे. हे बहिष्कृत्तासाठी नवीन नाही पण, दुःखालाही मर्यादा असतात, अमर्याद दुःखाच्या भोगात भोग भोगणे म्हणजे भूक आणि भाकर या मूलभूत प्रश्नाच्यासाठी ससानेनी केलेला संघर्ष मनाला चटका लावणारा आहे. ज्या समाजात आणि ज्या जातबंदिस्त वस्तीत सूर्यकांत ससाने जन्मले, त्या वस्तीवर

पारंपारिक समाज रचनेनी लादलेलं पारंपारिक दुःख आणि त्यांच्या वाट्याला आलेले दाहक अनुभव लक्षात घेता, जन्मता माणूस म्हणून जन्मलेल्या माणसानेच आपल्यासारख्याच माणसाशी किती खालच्या पातळीवर माणूसहिन वागावे, हे कालही निंदनीय होते, आजही निंदनीय आहे आणि उद्याही निंदनीय राहणार आहे म्हणून आम्ही माणूस म्हणून जगावेच कसे? हा मूलभूत प्रश्न सूर्यकांत ससानेच्या आत्मचरित्राने या मानवी समाजाला विचारलेला आहे.

सूर्यकांत ससाने यांनी बहुजन महापुरुषांच्या जयंती - स्मृतीदिना निमित्त अनेक प्रबोधनाच्या कार्यक्रमाचे स्वतः होऊन नियोजन केलेले आहे. समाज परिवर्तनासाठी जयंती- स्मृतिदिन साजऱ्या केलेल्या आहेत. त्याही शिवाय बहुजन महापुरुषांच्या अर्थात महात्मा बसवेश्वर, छत्रपती शिवाजी महाराज, क्रांतिवीर लहुजी साळवे, क्रांतीपिता महात्मा ज्योतिबा फुले, शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि सत्यशोधकी लोकसाहित्यिक अण्णा भाऊ साठे या समग्र परिवर्तनवादी विचारधारेच्या विविध सभा-संमेलनामध्ये सक्रियपणे सहभागी झालेले आणि समाज हितार्थ मार्गदर्शनही करताना सूर्यकांत ससाने दिसतात. त्यांनी महाराष्ट्रातील पुरोगामी चळवळीतील अनेक मान्यवरांच्या सहवासात ते स्वतःहून समरस झालेले आहेत. हे त्यांच्या अनेक नोंदीवरून स्पष्ट जाणवते. सूर्यकांत ससाणे हे उत्तम गायक, कवी आणि अनेक पुस्तकाचे लेखक नव्हेतर ग्रंथ विक्रेते म्हणूनही त्यांनी महापुरुषांच्या विचाराचा प्रचार आणि प्रसार करीत आहेत. हे त्यांच्या आत्मचरित्राचा महत्त्वाचा भाग म्हणून नमूद करणे आवश्यक वाटते. सूर्यकांत ससाने हे सातत्याने वाचते आणि लिहिते राहावे. ग्रंथ वाचनातून विचार प्रबळ आणि उन्नत होत असतात. नव्या जाणिवा घेऊन, लेखणी उभी टाकते नि लेखणीला धार निर्माण होते. सूर्यकांत ससानेच्या आत्मशोधा बरोबरच यांच्या भावी लेखनाला लाख-लाख शुभेच्छा!

जय लहुजी- जय भिम- जय क्रांती! सत्य की जय हो!

**प्रा. डॉ. भगवान वाघमारे, निलंगा.**

(परिवर्तनवादी चळवळीतील कार्यकर्ता)